# वसई-विरार शहर महानगरपालिका

## महिला व बालकल्याण विभाग

## मुख्य कार्यालय, विरार

---

दिनांक :०१/०१/२०२५

<u>प्रेस नोट</u>

**वसई-विरार शहर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागाच्या विविध योजनांची अर्ज घेण्याची मुदत २८ फेब्रुवारी, २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. तरी महिला व बालकल्याण विभागातील विविध योजनांचा लाभ नागरिकांनी घ्यावा - मा.आयुक्त तथा प्रशासक, वसई-विरार शहर महानगरपालिका यांचे आवाहन**

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत महानगरपालिका हद्यीतील गरीब व गरजूंना अनेक योजना मंजुर केल्या आहेत. यामध्ये **विद्यावर्धीनी शैक्षणिक** योजनेअंतर्गत विधवा/निराधार/घटस्फोटीत/परित्यक्ता महिलांच्या मुली व मुले, निराधार बालके, दिव्यांग, कर्णबधीर व मुकबधीर मुले व मुली, एच.आय.व्ही बाधीत पालकांच्या मुलांना, ज्या महिलेचे पती व्याधीग्रस्त असून अंथरुणास खिळलेले आहेत अशा महिलांच्या मुलांना तसेच अनाथ निराश्रीत बालकांना शैक्षणिक अर्थसहाय्य दिले जाते. तसेच **कोवीड-१९** मध्ये आई किंवा वडील मयत झालेल्या पालकांच्या मुले व मुलींना शैक्षणिक अर्थसहाय्य दिले जाते.

याचबरोबर **आधारमाया** योजनेअंतर्गत कुष्ठरोग बाधीत महिला, मुले व मुली तसेच ६० वर्षावरील एकाकी ज्येष्ठ महिलांच्या उपजिविकेकरिता मासिक अनुदान, **उत्तरदायी** योजनेअंतर्गत गतीमंद, मतिमंद मुलांच्या देखभालीकरीता मासिक अनुदान, **सुखदायिनी** योजनेअंतर्गत कुटुंब प्रमुख ७५ टक्के अथवा त्याहून अधिक दिव्यांग असणाऱ्यांच्या १४ वर्षाखालील मुलांना व सर्व वयोगटातील मुली व महिलांना मासिक अनुदान दिले जात आहे.

महिलांना डायलेसीस उपचाराकरिता **जिवनदायीनी** योजनेअंतर्गत प्रति खेप आर्थिक सहाय्य व कर्करोग बाधीत महिलांच्या उपचाराकरीता देखील वैद्यकिय सहाय्य, महिलांना मेमोग्राफी तपासणीकरिता व पॅप स्मीअर तपासणीकरिता अर्थसहाय्य महानगरपालिकेमार्फत देण्यात येते.**वरदायिनी** योजनेअंतर्गत निराधार, विधवा महिलेच्या मुली व ज्या मुलींचे आई - वडील दिव्यांग आहेत त्या मुलीच्या तसेच अंध,अपंग मुली व अनाथ/निराधार मुलींच्या लग्नाकरिता आर्थिक अनुदान, त्याचबरोबर **दत्तक** योजनेअंतर्गत मुला-मुलींना दत्तक घेतल्यास देखील महानगरपालिकेमार्फत प्रोत्साहान पर आर्थिक सहाय्य देण्यात येते. तसेच **श्रमसाधना** योजनेअंतर्गत ४५% ते ७५% दरम्यान अंधत्व व अपंगत्व असलेल्या महिलांना स्वयंरोजगाराकरिता अर्थसहाय्य,१८ ते २१ वयोगटातील अनाथ मुलींना उपजिविकेसाठी अर्थसहाय्य.

या सर्व योजनांची महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत दैनंदिन अंमलबजावणी सुरू असून,याबाबतची नियमावली व लाभार्थी नमूना फॉर्म महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालयात (महिला व बालकल्याण विभागात) व महानगरपालिकेच्या www.vvcmc.in या वेबसाईट वर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.महिला व बालकल्याण विभागाच्या या योजनांसाठी अर्ज सादर करण्याची मुदत **२८ फेब्रुवारी, २०२५** पर्यंत वाढविण्यात आली आहे. सदर योजनेकरिता पात्र महानगरपालिका हद्यीतील लाभार्थ्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी केले आहे.

**महिला व बालकल्याण विभाग**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**